|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARSHTRA UNIVERSITY, JALGAON**

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon)

'A' Grade NAAC Re-Accredited (4 th Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-आय /केमुप्र./ **१८८६** /२०२३ दि. १६.०५.२०२३

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय**:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उन्हाळी २०२३ परीक्षेसाठी Onscreen Digital Evaluation System अंतर्गत मूल्यांकन केंद्राचे कामकाज सुरू करणेबाबत

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाद्वारा घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील हिवाळी २०२२ च्या परीक्षांपासून प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य, बी.व्होक., बी.एस.डब्ल्यू. इ. वर्गाच्या परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन प्रचलित पध्दतीने महाविद्यालयीन स्तरावर आणि **इतर वर्गाच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन ऑनलाईन पध्दतीने Onscreen Digital Evaluation System या संगणकीय प्रणालीद्वारे इंटरनेट व संगणक सुविधा उपलब्ध असलेल्या विद्यापीठाने मान्यता दिलेल्या मूल्यांकन केंदावर करण्यात येत आहे.**

असे निदर्शनास आले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उन्हाळी २०२३ च्या परीक्षा दि.२४ एप्रिल, २०२३ पासून सुरू झालेल्या असून, अजूनही Onscreen Digital Evaluation System अंतर्गत बऱ्याच महाविद्यालयातील मूल्यांकन केंद्राचे कामकाज सुरू झालेले नसल्याचे दिसून येत आहे. कृपया, मूल्यांकन केंद्राचे कामकाज त्वरीत सुरू करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती. त्या अनुषंगाने खालील बाबी पुन:श्च कळविण्यात येत आहेत.:-

(१) विद्यापीठाने मूल्यांकन केंद्र निश्चित केलेल्या महाविद्यालयांनी आवश्यक त्या सोयी सुविधां अद्ययावत ठेवून मूल्यांकन केंद्राचे कामकाज त्वरीत सुरू करावे. तसेच रविवार व इतर सुट्यांच्या दिवशी देखील मूल्यांकन केंद्राचे कामकाज सुरू ठेवावे, जेणेकरुन शिक्षकांना जास्तीत जास्त सहभाग देता येईल व परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होण्यास सहाय्य होईल.

(२) सद्यस्थितीत B.B.A., B.A., B.COM., B.SC., B.A.M.C.J., B.C.A., B.S.W., M.C.A. इत्यादी अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाचे कामकाज सुरू झालेले असून, M.A., M.COM., M.SC. या अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाचे कामकाज लवकरच सुरू होणार आहे.

(३) विद्यापीठाच्या पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/२८९५/२०२२, दि.२३.११.२०२२ अन्वये कळविलेल्या कार्यपध्दती प्रमाणे महाविद्यालय/ परिसंस्थांनी अभ्यासक्रमनिहाय व विषयनिहाय विद्यापीठ मान्यताप्राप्त नियमित शिक्षकांची तसेच विद्यापीठाने परिनियम ४१५ (१) नुसार मान्यता दिलेल्या व कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असलेल्या शिक्षकांची देखील नोंदणी https://onmark.co.in/nmu/ या Link वर जाऊन करावयाची आहे.

...२

(४) अद्यापपावेतो ज्यांनी शिक्षकांची नोंदणी केली नसेल, त्यांनी त्वरित https://onmark.co.in/nmu/ या Link वर जाऊन user id व Password च्या सहाय्याने Login करुन त्यामध्ये दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील अभ्यासक्रम निहाय शिक्षकांची नोंदणी करावयाची आहे.

(५) मूल्यांकन कामकाजासाठी विद्यापीठामार्फत संबंधित अध्यापकांना नियुक्ती पत्रेही पाठविण्यात आलेली आहेत. तरीदेखील महाविद्यालयांमधील संबंधित विषयाचे अध्यापक मूल्यांकन कामकाजात सहभागी होत नसल्याचे दिसून येत आहे. आज अखेरपर्यंत अंदाजित ६५ ते ७० हजार उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन प्रलंबित असल्याने, सदर बाब विद्यार्थी हिताच्या दृष्टीने योग्य नसून, परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होण्यास अडचणीचे आहे.

(६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ मधील तरतुदीप्रमाणे ३० दिवसांच्या आत व जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत परीक्षांचे निकाल जाहीर करणे विद्यापीठावर बंधनकारक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ४८ (४) मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येक अध्यापकांवर विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामकाजास सहाय्य व सेवा देणे बंधनकारक असून, त्या अनुषंगाने आपल्या अधिनस्थ शिक्षकांना मूल्यांकन कामकाजासाठी उपस्थित राहणेबाबत सुचना द्याव्यात.

(७) मूल्यांकन केंद्राकडील अत्यल्प प्रतिसाद पहाता, मा.कुलगुरू महोदय, मा. प्र-कुलगुरू महोदय, कुलसचिव, अधिष्ठाता, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हे मूल्यांकन केंद्रावर केव्हाही भेटी देवू शकतात. करीता मूल्यांकन केंद्रावरील संगणक व इतर सुविधा अद्ययावत ठेवून आपल्या महाविद्यालयांतील संबधित अध्यापकांना, तसेच विद्यापीठाने परिनियम ४१५ (१) नुसार मान्यता दिलेल्या व कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असलेल्या महाविद्यालय/ परिसंस्थेतील अध्यापकांना शिफारस पत्र घेऊन मूल्यांकन कामकाजासाठी प्राधान्याने पाठविण्यात यावे.

(८) अध्यापकांना उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे कामकाज करीत असतांना आ**पल्या महाविद्यालय /परिसंस्थेतील अभ्यासक्रमनिहाय एकूण विद्यार्थी संख्येपेक्षा २० टक्के जास्त उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे आवश्यक राहील.** अध्यापकांनी याप्रमाणे मूल्यांकन केल्यानंतर विद्यापीठाकडून प्रमाणपत्र Online dash board वर देण्यात येईल.

(९) आपआपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील संबंधित शिक्षकांकडून लवकरात लवकर करुन मूल्यांकन प्रक्रियेत जास्तीत जास्त शिक्षकांनी सहभागी होण्याबाबत निर्देश देण्यात यावेत व परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होण्याच्या दृष्टीने विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(१०) On Screen Digital Evaluations System (OES) च्या अंमलबजावणीकरीता ज्या महाविद्यालय /परिसंस्थेत आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत, तेथील शिक्षकांनी नजिकच्या मूल्यमापन केंद्रावर जाऊन मूल्यांकनाचे कामकाज करावयाचे आहे, याबाबत मा.प्राचार्य/ संचालकांनी संबंधित शिक्षकांना **लेखी परवानगी** द्यावी..

(११) एकाच शहरात एकापेक्षा जास्त महाविद्यालय/परिसंस्थेत On Screen Digital Evaluations System (OES) मूल्यांकन केंद्र देण्यात आलेले आहे, मूल्यांकन केंद्र देण्यात आलेल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील शिक्षकांनी त्यांच्याच महाविद्यालय/परिसंस्थेच्या मूल्यांकन केंद्रावर मूल्यांकनाचे कामकाज करणे आवश्यक राहील.

(१२) On Screen Digital Evaluations System (OES) मूल्यांकन केंद्रावर मूल्यांकनासाठी येणाऱ्या शिक्षकांनी Oassis वर प्राप्त झालेल्या कार्यादेशाची प्रत किंवा प्राप्त ईमेलची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

(१३) On Screen Digital Evaluations System (OES) मूल्यांकन केंद्रावर नोंदवही ठेवून मूल्यांकन करणाऱ्या शिक्षकांची खालील नमुन्यात नोंद ठेवण्यात यावी.

**Name of Evaluation Centre मूल्यांकन केंद्राचे नाव**:-----------------------------------------------

| SR. No. | Date | Name of Teacher | Name of College/ Institute | Login ID | In Time | Out Time | Name of Paper Code | No.of Papers Evaluation | Signature of Teachers |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

(१४) मूल्यांकन केंद्रावर किती उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन झाले व किती शिक्षकांनी मूल्यांकनाचे कामकाज केले त्यांची यादी मा.प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठास सादर करावी.

(१५) सर्वच महाविद्यालय/परिसंस्थांनी एकूण शिक्षकांची यादी व मूल्यांकन प्रक्रियेत सहभागी न झालेल्या शिक्षकांची यादी मा.प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठास सादर करणे आवश्यक राहील.

(१६) On Screen Digital Evaluations System (OES) प्रणालीत मूल्यांकनाचे कामकाजाचे मानधन जमा करण्याच्या दृष्टीने संबंधित अध्यापकांनी आपले नाव, बँक खाते क्रमांक, IFSC कोड, SAP क्रमांक इ. माहिती मूल्यांकनासाठी Login करतांना सादर करावी.

कृपया मूल्यांकन प्रक्रिया सुरळित पार पाडण्याकामी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा.दिपक श.दलाल)
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत-माहिती व कार्यवाहीसाठी:**

१) उपकुलसचिव, (विज्ञान, शिक्षणशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा, परीक्षा गैरप्रकार चौकशी, रेकॉर्ड व पदवीप्रदान)परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) उपकुलसचिव (अ.का.), परीक्षा व मूल्यमापन (तंत्रज्ञान, औषधीनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर, मानवविज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम आणि ) विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) यंत्रणा विश्लेषक, संगणक केंद्र, परीक्षा व मूल्यमापन विभाग., क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) प्र.संगणक केंद्र प्रमुख, संगणक केंद्र, परीक्षा व मूल्यमापन विभाग क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव.
५) कक्ष अधिकारी, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (गोपनीय उत्तरार्ध) क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व विद्याशाखा विभागांचे प्रमुख व नियंत्रक अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**प्रत माहितीसाठी अग्रेषित. :-**

१.मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव २.मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
३.मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव,